# पसायदान

प्रभू थोर शेगावचा तूच आहेस। "अनन्यास रक्षी" तुझे ब्रीद आहे।
'करुणाकरा" या, ब्रीदा सार्थ व्हावे। महाराज, माझ्या जवळी रहावे ॥ १ ॥
असे मागणे ते तुझ्या पायी आता। तुझ्याविण कोणी मला नाही त्राता।
प्रभो सर्व या, संकटा निरवावे। महाराज, माझ्या जवळी रहावे ||२||
प्रभो ! जन्मी या मी, किती पाप केले। तया जाणिवेने, मन हे जळाले।
आता मात्र देवा, मला आवरावे। महाराज, माझ्या जवळी रहावे || ३ ||
अपराध माते ! पदरात घ्यावे। आता बालक या जवळी करावे।
तुझ्या "प्रकृतीला" गडे आवरावे। महाराज माझ्या जवळी रहावे ||४||
प्रभातीस अस्पष्टसी जाग यावी। तुझिया कृपेने, कुडी ही उठावी।
शुचिर्भूत प्राची "स्मृती" दान द्यावे। महाराज, माझ्या जवळी रहावे ॥५॥
कदा क्रोध, दोषा, मना ना शिवावे। शुचिर्भूत आचार वृत्तीत यावे।
तै शुद्ध बुद्धी मला दान द्यावे। महाराज माझ्या जवळी रहावे ||६||
आम्हा अन्न देतो, तया आधी देणे। तयावीण आम्ही, कदा नाही खाणे |
इये वृत्तिने "शक्ति" दानास द्यावे। महाराज माझ्या जवळी रहावे ॥७॥
नीतीयुक्त सात्वीक, लक्ष्मी मिळावी। प्रपंचात सत्कर्मी, ती वापरावी।
अशा दृष्टीने, "लक्ष्मी" दानास द्यावे। महाराज माझ्या जवळी रहावे ॥८॥
सुखे झोपता जाण काढोनी घ्यावी। बरे, वाईटाची स्मृती ना रहावी ॥
"शांति" दानास द्यावे। महाराज, माझे जवळी रहावे ॥९॥
कृपाळूपणे ' प्रपंचात कर्मे, असता करीत। तयामाजी राहो, सदा सावचित्त।
अनैतिक कृत्ये, कदा ना घडावी। महाराज माझे जवळी रहावे ॥१०॥
भवांमाजि कर्मे, नियमित व्हावी। कुटूंबा, मुलांची प्रीती सार्थ व्हावी।
व्यवहार चित्ते, असक्ते रहावे। महाराज माझे जवळी रहावे ॥११॥
नको काम, क्रोध नको दुष्ट बुद्धी। सुविचार शांती, समाधान वृद्धी।
असे भाव माझ्या, मनी नित्य यावे। महाराज माझे जवळी रहावे ॥१२॥
प्रति मासी वा वर्षी हा योग यावा। तुझ्या मंदिरी दर्शन लाभ व्हावा।
अखंडित वारी, मला गुंतवावे। महाराज माझे जवळी रहावे ||१३||

santgajananbhaktpariwar.in

धन, मन, कीर्ती, प्रपंची मिळाले। कधी दुःख भोग पदरांत आले।
इये दोन्ही काळी, समत्वे तरावे। महाराज माझे जवळी रहावे ॥१४॥
तुम्हा वर्णिता, वर्णिता, मी रमावे। समस्तांचिया अंतरी एक व्हावे।
माझे तुझे तई, अभिन्नत्व व्हावे। महाराज माझे जवळी रहावे ॥१५॥
तुझ्या चिंतनी चित्त एकत्र व्हावे | तुझ्या दर्शने नेत्र तृप्तीस व्हावे।
तुला पाहता पाहता, भान जावे। महाराज माझे जवळी रहावे ॥१६॥
तुझी मूर्त दृष्टी समोरी असावी। प्रभो माझी देहस्थिती विसरावी।
तुझे विण आता, कुणी ना दिसावे। महाराज माझे जवळी रहावे ॥१७॥
यमुना जलाने, शुचि स्नान व्हावे। मुखी शुद्ध गंगोदके या पडावे।
ओठांत तुलसी दलाने रहावे। महाराज माझे जवळी रहावे ॥१८॥
त्रिगुणात्मके, भाव वृत्ती नसावा। प्रसादे तुझ्या, भोग माझा सरावा।
पुढे जन्म-मृत्यु कदाना मिळावे। महाराज माझे जवळी रहावे ॥१९॥
दिला मोक्ष तू, भास्करा बा जसा रे। दिला मोक्ष तू भक्त बाळा जसा रे।
मला ही प्रभो, त्या स्थळा पोचवावे। महाराज माझे जवळी रहावे ||२०||
क्षणी शांत ऐसा, प्रभो प्राण जावा। जिवा आसरा त्या शिवाचा मिळावा |
मिसळून ज्योतीस तेजात घ्यावे। महाराज माझे जवळी रहावे ||२१||